# सुशिक्षित नागरिक

सुनंदा फार घाईतहोती. एटिएम् मधून पैसे काढायचे, दादरला जाऊन खरेदी करायची. परवा तिच्या भाचीचे लग्न होते. बरीच तयारी बाकी होती. ती स्टेट बँकेकडे गेली. अरे कोणीच बाहेर उभे नाहीा. असे कसे? चालू आहेना एटिएम्. वॉचमनला विचारावे तर तोही दिसत नाही जाग्यावर. एव्हढे विचार मनात गरगरेपर्यंत ती दारापर्यंत पोचली. दार लोटले, कोणीच नव्हते. ती पर्स उघडून कार्ड काढणार तर तिला तिथे काउंटरवर नोटांचा जुडगा दिसला. कोणीतरी पैसे काढले व विसरून गेले वाटते. कोणाला सांगणार ? बाहेर वॉचमन पण नाही. तिने एक पाकिट घेऊन ते पैसे मोजून त्यात ठेवले. ते दहा हजार रूपये होते. ते पाकिट तिने पर्सच्या बाहेरच्या कप्प्यात ठेवले. नंतर आपले कार्ड काढून पैसे काढले व ते आतल्या कप्प्यात ठेवले. पर्स बंद करून ती बाहेर आली. अजून वॉचमन आला नव्हता. ती थोडी पुढे जाऊन बँक ऑफिसमधे शिरली. इथे किती वेळ जाणार कोणजाणे! आता खरेदीसाठी दुपारीच जावे लागणार. मन परत विचारात गुरफटले. ती मॅनेजरच्या केबिनकडे पोचली. परवानगी घेऊन आत गेली.

"काय काम आहे ?" मॅनेजरने विचारले.
"मी आता एटिएम् मधून पैसे काढले. ते तुमच्या कॉम्प्युटरवर आलंय ना?"
त्यांनी चेक केले व हो म्हटले. "माझ्या अगोदर कोणी पैसे काढले त्या व्यक्तीचे नाव, नंबर, अमाउंट पण आले असेल ना? किती अमाउंट काढलेत?"
"ते आम्ही तुम्हाला सांगायला बांधिल नाही."
"दहा हजार आहेत ना? अहो ते तिथेच विसरून गेले. मी ते आणले आहेत. कृपया त्याना फोन करून बोलावता का? म्हणजे त्यांना देता येतील. काही अडचण घाईगडबड असेल व पैसे तिथेच विसरून गेले असतील. लक्षात आल्यावर शॉक बसल्या सारखा होउन माणूस रडकुंडीला येतो."

त्यांनी तीन चारदा फोन फिरवला लागेना. ते म्हणाले, 'विमलाबाई धारप असे नाव आहे.' पत्ता आहे का? जवळपासचा असेल तर मी जाता जाता देईन त्यांना."
त्यांनी पत्ता सांगितला.
"मीपण त्याच गल्लीत रहाते. मी त्यांना घरी जाऊन पैसे देते. तुम्हीपण फोन लागल्यावर कळवा. माझे नाव सुनंदा वर्दे. बरं मी येऊ?"
ती घाईने बाहेर पडली. गल्लीत शिरल्यावर तिसरीच बिल्डिंग होती. जुनी बिल्डिंग. वॉचमन नव्हता. पाटीवर नाव होते विमलाबाई धारप. ब्लॉक नंबर नऊ. दोन मजले चढून दमली. हल्ली नवीन घरी सातव्या मजल्यावर रहायला आल्यापासून जिने चढायची सवय मोडली होती कारण बिल्डिंममधे लिफ्ट होती. तिने जरा दम घेतला व बेल वाजवली.

बऱ्याच वेळाने आतले दार उघडले. ही जाळीच्या दरवाजा बाहेर उभी.
"कोण पाहिजे ? बाहेर अनोळखी चेहरा बघून आतून आवाज आला "कोण पाहिजे तुम्हाला?"
"विमलाबाई धारप इथेच रहातात ना? मी सुनंदा. तुमचे पैसे द्यायला बँकेतून आलेआहे." तिने पैशाचे पाकिट काढून जाळीतून आत सरकवले. मोजून बघा दहा हजार आहेत ना!" विमलाबाईनी पाकिट उघडले.त्यांचा विश्वास बसेना. त्यानी दार उघडले. म्हणाल्या, "हल्ली अनोळखी माणसाबद्दल अविश्वास वाटण्याचा काळ आलाय. क्षमा करा. पण तुम्हाला हे पैसे कुठे मिळाले व माझेच म्हणून कसे समजले."
सुनंदाने त्यांना सर्व घटना सांगितली. सुनंदा म्हणाली "आता मी जाते. मला आज खूप कामे आहेत." विमलाबाईनी चहा सरबत काहीतरी घ्या असा आग्रह केला. सुनंदा म्हणाली मी याच गल्लीत शेवटच्या बिल्डिंगमधे रहाते. परत कधीतरी येईन व तुम्हाला माझ्या घरी पण घेऊन जाईन. विमलाबाई म्हणाल्या, "तुम्ही फार मोठं सचोटीचं व पुण्याचं काम केलंय. हे माझे पेन्शनचे पैंसे. हे मिळाले नसते तर माझा महिना कसा गेला असता कोण जाणे. खूप उपकार आहेत तुमचे."
सुनंदा म्हणाली, "पुढच्या वेळी पैसे काढायला जाताना कोणाला तरी बरोबर घेऊन जा. कोणी नसेल तर मी येईन. परत भेटू." असे म्हणून निघाली. विमलाबाई बघतच राहिल्या.
सद्गदित झाल्या. म्हणाल्या, "देवा तुझ्या राज्यात अशी माणसे आहेत म्हणून हे जग नीट चालले आहे, हीच तुझी कृपा!"

**नलिनी करंडे**